## अभियोग पक्षाचा सा.क्र. ०४ चा शपथेवर पुरावा.

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की,
माझे नांव – गोविंद हरिभाऊ राठोड
वय – ६२ वर्षे, धंदा -सेवानिवृत्ती सहा.पो.उपनिरीक्षक,
रा. परभणी ता. परभणी जि. परभणी

**सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. जी. गिरी यांच्या तर्फे सरतपास शपथेवर सुरु.**

१. सन २०१५ मध्ये दुरक्षेत्र नळेगाव येथे मी कार्यरत होतो. दि.०४.०६.२०१५ रोजी गुन्हा क्र. १३७/२०१५ ठाणे अंमलदार कांबळे यांनी दाखल करुन तपास माझेकडे दिला होता. मी तपासामध्ये दोन पंचासमक्ष ०४.०० ते ०४.३० वा. घटनास्थळाचा पंचनामा केला होता. आता मला तो घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी व पंचाच्या सहयाआहेत, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.पी-१ पी.डब्ल्यु.४/८७** देण्यात आले. त्यानंतर मी तपासामध्ये पाच साक्षीदारांचे जबाब नोंदविले होते.

२. दि.०८.०६.२०१५ रोजी आरोपी पोलीस ठाणे येथे हजर झाले होते व त्यांनी गुन्हयात वापरलेली काठी हजर केली होती. त्याबाबतचा जप्ती पंचनामा करण्यात आला होता, आता मला तो जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी व दोन पंचाच्या व आरोपीची सहया आहेत, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.पी-२ पी.डब्ल्यु.४/८८** देण्यात आले. त्याच्या नुसार वेळूची काठी जप्त करण्यात आली होती. मला ती काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. दि.

२२.०७.२०१५ रोजी मी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले होते. दि.३०.०७.२०१५ रोजी आरोपी विरुध्द पुरावा आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

३. मी साक्षीदार विनोद बबुवान पडीले यांचा जबाब नोंदविला होता. मी त्याच्या सांगण्यानुसार जबाब नोंदविला होता, आता मला तो जबाब दाखविण्यात आला, त्यास **नि.क्र.पी-३ पी.डब्ल्यु.४/८९** देण्यात आले. तपासात आरोपीने काठीने व लाथा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली होती व जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती असे निष्पन्न झाल्यामुळे मी दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी हजर झाल्यास मी त्यांना ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही. गंभीरे यांच्यामार्फत सुरु.</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही पंच घेऊन न जाता मी घटनास्थळावर न जाता खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्ती पंचनामा तयार केला आहे व कोणत्याही आरोपीकडून काठी जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदार विनोद बबुवान पडीले यांचा जबाब त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही साक्षीदारांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोदंविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व फिर्यादी यांनी संगनमत करुन डॉक्टरांकडून खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यदीशी संगनमत करुन कोणताही गुन्हा निष्पन्न होत नसतांना मी खोटे

आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.06.09 12:25:40 +0530

(व्ही.एस. वाघमोडे)

दि. ०९.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.